महाराष्ट्र नागरी सेवा निवृत्तीवेतन नियम 1982 मध्ये सुधारणा करण्याबाबत 7व्या वेतन आयोगाच्या शिफारशीनुसार दि 1.1.2016 नंतर सेवानिवृत्ती झालेल्या निवृत्ती वेतन धारकाचे निवृत्ती वेतन/कुटूंब निवृत्ती वेतन लाभ सुधारित करण्याबाबत.

**वाचा** :– 1 शासन निर्णय क सेनिवे–2019/प्र क 58/सेवा 4 दि 1/3/2019
2 शासन निर्णय क सेनिवे–2019/प्र क 348/सेवा 4 दि 5/2/2021

# परिपत्रक

जावक क अप्रवि/पीईएण/सुवे–2016/339/2021 दि. 30/06/2021

महाराष्ट्र शासन वित्त विभाग निर्णयानुसार राज्य शासनाच्या निवृत्त झालेल्या अधिकारी/कर्मचारी यांना शासनांने मंजूर केल्याप्रमाणे 7 व्या वेतन आयोगानुसार सुधारीत वेतन श्रेणी दि. 1 जानेवारी 2016 पासून लागू केली असून त्या अधिकारी व कर्मचा–यांची सुधारीत वेतन श्रेणीत वेतन निश्चीती वरील दिनांकापासून करण्यात आलेली आहे.

त्या अनुषंगाने उपरोक्त शासन निर्णय कृषि विद्यापीठातील सेवानिवृत्त अधिकारी व कर्मचा–यांना दि.01/01/2016 पासून लागू करण्यात येत आहे. निवृत्तीवेतन/कुटूंब निवृत्तीवेतन धारकांच्या निवृत्ती/कुटूंब निवृत्तीवेतन शासन निर्णयानुसार दि 1. जानेवारी 2016 पासून सुधारणा करण्यात यावी.

तसेच शासन निर्णय क सेनिवे– 2019/प्र.क. 58/ सेवा 4 दि 1/3/2019 व महाराष्ट्र शासन निर्णय क सेनिवे– 2019/प्र.क 348/सेवा 4 दि 5/2/2021 नुसार उपदानाची मर्यादा रु. 7.00 लाखावरुन रु. 14.00 (लाख) तथापि सुधारीत वेतनाच्या कमाल 16.5 पट कमी असेल ते सेवानिवृत्ती उपदान शासन निर्णयान्वये देय राहील.

दि 1. जानेवारी 2016 नंतर निवृत्त झालेल्या/निवृत्त वेतन आदेश प्राधिकृत झालेल्या निवृत्ती/कुटूंब निवृत्तीवेतन धारक/ मृत पावलेला कर्मचा–यांची सेवापूस्तके कुलसचिव डॉ पं.दे.कृ.वि., अकोला यांच्या कार्यालयाकडून प्राप्त करुन त्यांची शासन निणर्यानुसार 7 व्या वेतन आयोगाप्रमाणे सुधारीत वेतन श्रेणीप्रमाणे वेतननिश्चिती करुन उपरोक्त शासन निर्णयातील तरतूदी प्रमाणे निवृत्ती/कुटूंब निवृत्ती वेतनाची गणना करुन अंतिम वेतनप्रमाणपत्र तयार करुन सोबत सुधारीत गणज्ञापण कुलसचिव कार्यालयात पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यात यावे.

सर्व आहरण संवितरण आधिकारी सर्व नियंत्रण अधिकारी/विभाग प्रमूख/आहरण व संवितरण अधिकारी यांना कळविण्यात येते की, दि.1 जानेवारी 2016 नंतर सेवानिवृत्त/मृत कर्मचा–यांची/कुटूंब निवृत्ती वेतन धारकांची प्रकरणे शासन निर्णयातील तरतूदी प्रमाणे सुधारीत लाभ प्रदान करण्यासाठी तयार करुन यथाशिघ्र कुलसचिव कार्यालयात पाठवावी व यापूढे अधिकारी/कर्मचारी सेवानिवृत्त / मृत होतील अशांची प्रकरणे सुधारीत वेतन श्रेणीनुसार परिगणित करावी.

उपरोक्त शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.inया संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संकेतांक **201903011202133305, 202102051531513805** हा असा आहे. नियंत्रण अधिकारी/विभाग प्रमुख/आहरण व संवितरण अधिकारी यांना कळविण्यात/विनंती करण्यात येते की, उपरोक्त शासन निर्णयाच्या प्रती संकेतस्थळावरुन प्राप्त करुन घ्याव्यात.

मा.कुलगुरु महोदय यांचे मान्यतेने.

नियंत्रक
**डॉ पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ,**
**अकोला**

प्रतिलीपी:
1. मा.कुलगुरु यांचे स्विय सहायक, यांना मा.कुलगुरु महोदय यांच्या माहितीकरीता सादर.
2. मा.कुलसचिव, डॉ.पंदेकृवि,अकोला यांना माहितीकरीता
3. नियंत्रण अधिकारी (सर्व) डॉ.पंदेकृवि, अकोला
4. विभाग प्रमुख /कार्यालय प्रमुख /प्रभारी अधिकारी/आहरण व संवितरण अधिकारी (सर्व) डॉ.पंदेकृवि, अकोला
5. वेतन व लेखाधिकारी, डॉ.पंदेकृवि,अकोला/नागपूर यांना माहितीकरीता
6. प्रभारी अधिकारी, संगणक केन्द्र, डॉ.पंदेकृवि, अकोला यांना कळविण्यात येते की, सदरचे परिपत्रक विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसारीत करण्यात यावे.

New Pension Order-1